नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक ०६/०९/२०२२ (मंगळवार)**

**(सकाळ)**

---

## चोरी

**१) पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :– अंतर्गत हर्ष पेन्ट कंपनी एमआयडीसी बोरी येथे दिनांक २७/०८/२०२२ चे १४.०० वा. ते १७.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– जसपाल कुलवंत सिंग, वय ३९ वर्ष, रा. सेक्टर क्र. ६, सीबीडी बेलापुर नवि मुंबई यांचे एमएच–४६/एफ–३६०५ क्रमांकाच्या टॅंकर मध्ये आरोपी नामे– मो. एजाज मो. वाहब वय २३ वर्ष रा. हरिया, पो. पिरालिया, जि. बस्ती राज्य उत्तर प्रदेश हा बीएएफएल इंडीया लिमिटेड कंपनी दहेज गुजरात येथे लोड केलेला ॲक्रॉनोल घेवुन एमआयडीसी बोरी भारकस येथील कंपनीचे बाजुला येवुन टॅंकर मधील २०,०००/– रू. चा ऑक्रनोल चोरून संपुर्ण टॅंकर मध्ये पाणि मिळविल्याने १७,९३,४४७.५०/– रू. चे नुकसान केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ४०७, ४२७ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि राय ९९२३४२४७६७ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. पारशिवनी** :– अंतर्गत १६ कि. मी. अंतरावरील मौजा डुमरीकला शिवार नागपुर ते जबलपुर हायवे वर येथे दिनांक ०४/०९/२०२२ चे १९.०० वा. ते १९.३० वा. फिर्यादी नामे– सुधाकर प्रकाश चिलपुरी वय ३५ वर्ष रा अरोली ता. मौदा यांचे डुमरीकला शिवारातील शेतामध्ये पेट्रोलपंपचे बांधकाम सुरू असलेल्या शेतामधुन आरोपी नामे– योगेश सोमनाथ शुक्ला, वय ३२ वर्ष, रा. कळमना, नागपूर व इतर ०३ यांनी संगणमत करून फिर्यादीच्या शेतातील अंदाजे एक ते दीड क्विंटल लोहा अंदाजे कि. १०,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार रविंद्र बर्वे हे करीत आहे.

**३) पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील धामनगाव येथे दिनांक ०३/०९/२०२२ ते दिनांक ०५/०९/२०२२ चे ११.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– आनंद हरीचंद्र उके, वय ५९ वर्ष, रा. तकीया वार्ड, भंडारा हे धामनाव शिवारातील लक्ष्मणजी ढोरे यांची १.२५ एकर ठेक्याने करित असून त्या ठिकाणी विट्टा भट्टी चे काम करित होते. पाउसाळया मुळे भट्टी बंद असल्याने भट्टी ला लागनारे साहित्य विट्टा भट्टी गोडाउन मध्ये ठेवले असता त्यातील क्राम्टन ग्रीव्स या कंपनीच्या ईलेक्ट्रीक लागणारी ७.५ एच पी च्या तिन मोटर प्रत्येकी कि ७,०००/–रू. प्रमाणे २१,०००/–रू. व एक श्री.जी कंपनीची ३ एच पी मोटर कि. १०,०००/–रू. असा एकुण कि. ३१,०००/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४६१, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार येंगलवार मो.क्र. ९४२३२१९४२९ हे करीत आहे.

## मोटरसायकल चोरी

**पो.स्टे. रामटेक** :– अंतर्गत शितलवाडी येथे दिनांक ०४/०८/२०२२ चे १९.३० वा. ते २०.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– दिगांबर चित्रमुग पारधी, वय ३४ वर्ष, रा. चिरेखाली, तिरोडा हा शितल बार च्या पार्कींग मध्ये आपली एमएच–३५/एएन–२६९७ क्रमांकाची मोटरसायकल उभी करून बारच्या आत गेला होता. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीची कि. ५०,०००/–रू. ची मोटरसायकल चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार राउत मो.नं. ९४२३६२८३०७ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**